अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

ख्रिसमस (नाताळ) सणानिमित्य सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

गुरूवार, दि. 25 डिसेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 19 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# किडनी रॅकेट प्रकरणातील मास्टरमाईंड पोलीसांच्या ताब्यात

## एसआयटीची यशस्वी कामगिरी, सोलापूरातून अटक

नागभीड/प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडविणाऱ्या नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतकरी किडनी विक्री प्रकरणात विशेष तपास पथकाला मोठे यश मिळाले असून, पीडित रोशन कुडे याला कंबोडियात किडनी विक्रीसाठी प्रवृत्त करणारा एजंट 'डॉ. कृष्णा' पोलीसांच्या ताब्यात आला आहे. तो सोलापूरचा रहिवासी असून, 'डॉ. कृष्णा' या बनावट नावाने लोकांना फसवत होता. आरोपीचे खरे नाव मल्लेश आहे. तो डॉक्टर नसून इंजिनिअर आहे. धक्कादायक बाब म्हणजे त्याने स्वत:चीही किडनी विकली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे नाशिकनंतर राज्यातील आणखी एका जिल्ह्यापर्यंत पोहचले असल्याने किडनी विक्री प्रकरणातील पिडीतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

चंद्रपुर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर या गावातील रोशन कुडे या शेतकऱ्याने सावकारांचे कर्ज फेडण्यासाठी कंबोडियात किडनी विकली. फेसबुकवरील 'किडनी डोनर कम्युनिटी' या पेजच्या माध्यमातून तो एका व्यक्तीच्या संपर्कात आला. आपण चेन्नई येथील असून व्यवसायाने डॉक्टर असल्याचे त्याने रोशनला सांगितले. त्यानंतर 'डॉ. कृष्णा' आणि कुडे व्हॉट्सअप चॅटच्या माध्यमातून संपर्कात होते. ८ लाख रूपयांत किडनी विकण्याचा निर्णय झाल्यानंतर कंबोडियाला जाण्यापूर्वी कोलकाता विमानतळावर या दोघांची पहिली आणि शेवटची भेट झाली. किडनी विक्रीनंतरही ते एकमेकांच्या बराच काळ संपर्कात होते. किडनी विक्री प्रकरणात सहा सावकारांविरोधात

(उर्वरित पान क्र. ६ वर)



डॉ. कृष्णा
उर्फ रामकृष्णन मल्लेशम सुंचू

### असा गवसला "डॉ. कृष्णा"

**या संपूर्ण प्रकरणात रोशन कुडे ज्या 'डॉ. कृष्णा' नावाच्या व्यक्तीशी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून संपर्कात होता त्या क्रमांकाचे सिम कुणाच्या नावावर आहे, याची माहिती मोबाईल कंपनीकडून मिळविण्यात आली. तेव्हाच "डॉ. कृष्णा" हे नाव बनावट असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. त्यानंतर त्या क्रमांकाचे लोकेशन पोलिसांनी शोधले. जेव्हा कुडे आणि डॉ. कृष्णा यांच्यात संपर्क व्हायचा तेव्हा तो क्रमांक सोलापूरात असल्याचे आढळले. त्यामुळे "डॉ. कृष्णा" चेन्नईचा नव्हे तर सोलापूरचा असल्याची खात्री पटली. त्याचे लाईव्ह लोकेशन ट्रेस करून रविवारी त्याला ताब्यात घेण्यात आले.**

# ब्रम्हपुरी नगराध्यक्षपदी काँग्रेसचे योगेश मिसार विजयी

## भाजपचा दारूण पराभव

ब्रम्हपुरी/का.प्र.

विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्त्वात काँग्रेसने निवडणूकीत घवघवीत यश प्राप्त केले. काँग्रेसचे उमेदवार योगेश मिसार यांनी निकटम प्रतिस्पर्धी भारतीय जनता पक्षाचे प्रा. सुयोग बाळबुद्धे यांचा ९५७३ मतांनी पराभव केला. बसपाचे निहाल ढोरे हे तृत्तीय क्रमांकावर राहीले. नगरसेवक पदाच्या एकुण २३ जागांपैकी काँग्रेसने २१ जागांवर विजयश्री खेचून आणला. तर भाजपा व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांना प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले. काँग्रेस पक्षाने ब्रम्हपुरी नगर पालिकेवर एकहाती सत्ता प्राप्त करीत नगर पालिका सभागृहात स्पष्ट बहुमत प्राप्त केले.

नगराध्यक्ष पदाच्या थेट निवडणूकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार योगेश बालाजी मिसार यांना १५४०८ मते मिळाली. माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या नेतृत्त्वात भारतीय जनता पक्षाचे प्रा.सुयोग बाळबुद्धे यांना ५८३५ मते प्राप्त झाली. बहुजन समाज पार्टीचे निहाल ढोरे यांना ८३२, तिसऱ्या आघाडीचे शिवसेना (उबाठा) चे मिलिंद भनारे यांना ७३० मते प्राप्त झाली.

प्रभागनिहाय विजयी उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे. प्रभाग क्रमांक १. (अ) काजल तलमले (काँग्रेस) (१०९२ मते), (ब) चंद्रकांत बावनकुळे (काँग्रेस) (९५३ मते), प्रभाग क्रमांक २ (अ) बबिता आमले

(उर्वरित पान क्र. ६ वर)



**योगेश मिसार**
काँग्रेस
प्राप्त मते : १५,४०८



**सुयोग बाळबुद्धे**
भाजपा
प्राप्त मते : ५,८३५

**माजी आम. स्व. बाबासाहेब खानोरकर यांच्या सुपुत्री रश्मी पेशने यांचा पराभव**

**माजी नगर परिषद उपाध्यक्ष व रिपाई नेता अशोक रामटेके पराभूत**

**माजी नगरसेवक मनोज कावळे, नितिन उराडे, मनोज भूपाल, सतिश हुमने विजयी**

**राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे उमेदवार अविनाश राऊत केवळ ०१ मताने तर भाजपचे मनोज भूपाल अवघ्या ०७ मताने विजयी**



## संपादकीय...

# लहानांच्या हाती वाहन नकोच..

मोटार वाहन कायदयात दुचाकी-चारचाकी चालविण्याचे वय ठरविण्यात आले आहे. तरीही अनेक आई-वडील प्रेमापोटी मुलांच्या हाती वाहन देत संकट ओढवून घेतात. अनेकदा मुलेच पालकांची नजर चुकवून वाहन नेतात. पुढे काय होणार, याचे त्यांना भानही नसते. नागपुरात असाच प्रकार घडला आणि मुलाने केलेल्या कृतीचा भुर्दंड वडिलांना बसला. मुलाने वाहन कायद्याचा भंग केल्याबद्दल पित्याला ३० हजार रुपयांचा दंड भरावा लागला. ही घटना सोनेगाव पोलिस स्टेशन अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली. पातील पिता पोलिसी कारवाईच्या विरोधात न्यायालयात गेला, पण न्यायाधीशांनी पोलिसांची बाजू योग्य असल्याचा निर्वाळा देत पित्याला दंड भरण्याचा आदेश दिला. अखेर हतबल पित्याने पश्चात्ताप व्यक्त करीत ३० हजारांनी खिसा रिकामा करवून घेतला. दंड भरताना वडिलांना मुलाचा राग आला असेल, पण त्या पित्याला पैसे भरावे लागले.

अशी वेळ इतर पित्यांवर येऊ नये म्हणून आजच सावध व्हा आणि लहान मुलांच्या हाती चारचाकी, दुचाकी वाहने देऊ नका. त्यांना कायद्यात राहण्याचे फायदे समजावून सांगा. प्रत्येक ठिकाणी कायदा मोडण्याची गरज नसते. आई- वडिलांनी कायदा मोडून मुलांना आपल्याच लोकांविरोधात क्रांतिकारी बनवायची गरज नाही. तो चांगला संस्कारी नागरिक झाला तरी आपले जीवन सार्थकी लागले, याचे समाधान आई-वडिलांनी मानायला हवे. बहुतांश कुटुंबांत वडील कामानिमित्त नेहमीच बाहेर असतात. यामुळे घरात मातृशक्तीचा जागर असतो. समजा मातृशक्तीने आपल्या मुला-मुलींना दररोज घरातून बाहेर पडताना मोटार वाहन कायद्याची माहिती दिली तर नक्कीच आपण अपघातमुक्त शहर तयार करू शकतो. एवढेच नव्हे तर अल्पवयीन मुलेही वाहन नेण्यापूर्वी दहा वेळा विचार करतील. परिणामी कटु प्रसंग संबंधित कुटुंबांवर ओढवणार नाहीत. असाच लोकहितवादी प्रयोग रोडमार्क फाऊंडेशनचे अध्यक्ष राजू वाघ यांनी नागपुरात 'मातृशक्तीचा जागर अपघातमुक्त भारताची वाटचाल' हा उपक्रम सुरू करून केला आहे. ते म्हणतात, जेव्हा आई-वडील मुलांना संस्कार देतात, तेव्हाच त्यांनी वाहन नेमके कुठल्या वयात हाती घ्यायला हवे, हेदेखील समजावून सांगायला हवे. प्रत्येक घरात आईचे महत्व आहे. आईचा शब्द शेवटचा मानला जातो. समजा त्या मातृशक्तीने पुढाकार घेत लहान मुलांच्या हाती वाहन द्यायचे नाही, असा नियम अमलात आणल्यास कुठल्याही वडिलांवर दंड भरण्याची नामुष्की ओढवणार नाही. वस्तुतः लहान मुलांनी अर्जुनाप्रमाणे आपल्या ध्येयावर लक्ष द्यायला हवे. जेव्हा मुले समाजहितकारक कार्य करण्याची मनीषा ठेवतील, तेव्हाच त्यांच्या जीवनात प्रगतीचा चमत्कार घडेल. 'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढो। किती हाकला हाकला, फिरी येतं पिकांवर । मन मोकाट मोकाट, त्याले ठायी ठायी वाटा। जशा वाऱ्यानं चालल्या, पानावरच्या लाटा ।।' ही बहिणाबाई चौधरी यांची कविता मनाचा ठाव घेणारी आहे.

लहान मुलांचे मन असेच असते. त्यांच्या हाती वाहन आल्यावर त्यांच्या कानात वारा घुसतो अन् ते बेभान होतात. आपण वायुवेगाने गेल्याने एखाद्या निष्पाप व्यक्तीचा प्राण जाईल, तो कायमस्वरूपी जायबंदी होईल याची त्यांना भीती वाटत नाही. ते थरार म्हणून वाहन वेगाने चालवितात. नंतर जे नको घडायचे ते घडते अन् सारा मामला पोलिस ठाण्यापर्यंत येऊन पोहोचतो. तिथे दोषीचे कुटुंबीय गयावया करतात. पण वेगाने वाहन चालविणे म्हणजे चंद्रावर जाण्यासारखे नाही. मात्र वयाप्रमाणे मुला-मुलींच्या मनात वेगळा थरार करण्याचा बेत असतो. परंतु मी म्हणतो, मुला-मुलींना थरारच करायचा असेल तर तो अभ्यासात करावा. आसपास राहणाऱ्या लोकांना मदत करून केल्यास उत्तमच होईल. जेव्हा तुमची मुले अशी कृती करतील, तेव्हा तुम्हाला त्यांचा अभिमान वाटेल. पित्याची ५६ इंची छाती अभिमानाने फुगेल आणि मी या मुलाचे वडील, असे ते जगाता निक्षून सांगतील. तो दिवस आपल्याही आयुष्यात यावा असे ज्यांना वाटते, त्यांनी आजपासून लहान मुलांच्या हाती वाहन देणार नाही, असा संकल्प सोडून तशी कृती करावी. अन्यथा, केशाने केले नाऱ्याला ताप यासाठी तयार राहा.

# आम. बंटी भांगडिया यांच्या आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात महिलांचे उपोषण मागे

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील खेड मक्ता येथील सरपंच दीक्षा भजनकर यांच्या नेतृत्वात महिला



शेतकऱ्यांनी सायघाटा येथील गोसीखुर्द प्रकल्प कार्यालयासमोर दिनांक १५ डिसेंबर पासून आमोरण उपोषण सुरू केले होते. तब्बल सहा दिवसानंतर आमदार बंटी भांगडिया यांनी महिलांनी आमरण उपोषण मागे घ्यावे अशी विनंती केली. आमदार बंटी भांगडिया यांनी तुमच्या पाणी समस्यांचे निवारण केले जाईल असे सांगितले. त्यानंतर उपोषण करत्या महिलां शेतकऱ्यांना सरबत आणि पाणी पाजून उपोषण मागे घेण्यात आले.

नाली संदर्भात टप्प्या-टप्प्याने ४५ किलोमीटर पर्यंत पाणी सोडण्यात येणार असून लागेल तेवढा पाणी धान्य पिक निगेपर्यंत मिळेल पण तो पाणी टप्प्याटप्प्या सोडला जाईल. असे आमदार बंटी भांगडिया यांनी सांगितले. यासंदर्भात शेतकऱ्यांची संदर्भीय बैठक नागपूर येथील विभागीय कार्यालयात पार पडणार असून त्या ठिकाणी पूर्णत्व निर्णय घेतला जाईल अशी माहिती विनोद झोडगे यांनी दिली आहे.

याप्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते विनोद झोडगे, ब्रह्मपुरी नगरपरिषदेचे माजी बांधकाम सभापती विलास विखार, आवेश पठाण, जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष कृष्णलाल सहारे, नागभीड तालुका भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष संतोष रडके, शिवसेना नेते चंद्रपूर ऊपजिल्हा प्रमुख संजय पारटवार, योगेश्वर ठाकरे आणि ब्रह्मपुरी, नागभीड तालुक्यातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...**
**www.bramhapurisamachar.com/bs**

# अवैध सावकारीला आळा घालण्यास प्रशासन ॲक्शन मोडवर

## प्रशासनाच्या नियमांचे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे सावकारांना आवाहन



चंद्रपूर/प्रतिनिधी

चंद्रपूर जिल्ह्यात अवैध सावकारीतून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शुक्रवारी जिल्ह्यातील सर्व सावकारांची आढावा बैठक घेतली. सावकारी कायदा व अधिनियम २०१४ मध्ये दिलेल्या नियमांचे पालन करूनच सावकारी करणे बंधनकारक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. नियोजन सभागृह येथे पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जयसिंह ठाकूर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, महाराष्ट्रात सावकारी कायदा अधिनियम - २०१४ लागू आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून सावकारांनी नियमांचे पालन करावे. सर्व परवानाधारक सावकारांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. शासनाने व्याजाचा दर निश्चित केला आहे. या दरापेक्षा जास्त दर आकारू नये. जास्त दर लावणे हा गुन्हा असून कायदेशीर कारवाईची तरतुद नियमात आहे. तसेच कर्ज दिल्यानंतर वसुलीकरीता मारहाण, अवैध मार्गाने दमदाटी व बळजबरी करता येणार नाही. व्यवसाय करतांना नियम आणि कायदे पाळणार नाही, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी स्पष्ट केले.

सादरीकरणात जिल्हा उपनिबंधक ठाकूर यांनी उपस्थित सावकारांना कायद्याबाबत माहिती दिली. यावेळी ते म्हणाले, सावकारी कायदा व अधिनियम २०१४ च्या कलम ५ नुसार व्यवसायासाठी परवाना घेणे आवश्यक आहे. सावकारी रेकॉर्डची तपासणी करण्याकरीता निबंधकाने मागणी केल्यास कलम १६ नुसार ती उपलब्ध करून देणे प्रत्येकाला बंधनकारक आहे. तसेच अवैध सावकारीतून मालमत्ता खरेदी केली असल्यास कलम १८ नुसार ती रद्द करण्याचे अधिकार निबंधकांना आहे. राज्य शासनाच्या १६ सप्टेंबर २०१४ च्या कायद्यामध्ये व्याजाचे दर निश्चित करण्यात आले आहे. यापेक्षा जास्त दर लावले तर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

### येथे करा तक्रार

**जिल्हा हेल्पलाईन क्र. १८००२३३८६९१ वर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर, सहाय्यक निबंधक, सहकार विभाग, उप निबंधक, सहकार विभाग, जवळचे पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करू शकतो. आपली तक्रार गोपनीय ठेवण्यात येईल.**

### विनोदिनी

*जमींदार अपने रिश्तेदार के सामने डींग हांकता हुआ कहता है...*
*जब मैं सुबह-सुबह कार में अपनी जमीन देखने के लिए जाता हूं... तो शाम तक भी पूरी जमीन नहीं देख पाता...*
*रिश्तेदार : आप बिल्कुल ठीक कहते हो... ३ साल पहले हमारे पास भी ऐसी एक खटारा कार थी, जो हमने बड़ी मुश्किल से बेची.....!*
*आप भी तुरंत बेच दो...*
*ऐसी कार का क्या काम... जो पूरी जमीन एक दिन में ना देख पाए...!!!*

# ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणूक २०२५ मध्ये प्रभागनिहाय उमेदवारांना मिळालेली मते

## नगराध्यक्ष पदी काँग्रेसचे योगेश मिसार यांना मताधिक्य



**योगेश बालाजी मिसार**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
प्राप्त मते - १५४०८



**सुयोगकुमार वा. बाळबुध्दे**
भारतीय जनता पार्टी
प्राप्त मते - ५८३५



**मिलिंद नानाजी भनारे**
शिवसेना (उबाठा)
प्राप्त मते - ७३०



**निहाल अंबर ढोरे**
बहुजन समाज पार्टी
प्राप्त मते - ८३२

### प्रभाग क्र. १ अ
एकूण वैध मते - २३३५

| | | |
|---|---|---|
| १. | काजल तलमले | १०९२ |
| २. | यामिना बठे | ४५७ |
| ३. | प्रियंका साखरकर | ७६९ |
| | नोटा - | १७ |

प्रभाग १ अ मध्ये काँग्रेसच्या काजल तलमले विजयी

### प्रभाग क्र. १ ब
एकूण वैध मते - २३३५

| | | |
|---|---|---|
| १. | नितेश आंबोरकर | ७७९ |
| २. | कालिचरण बगमारे | ४५९ |
| ३. | चंद्रकांत बावणकुळे | ९५३ |
| ४. | दिनेश मुंडले | ७७ |
| ५. | हरिश्चंद्र सहारे | १८ |
| | नोटा - | १३ |

प्रभाग १ ब मध्ये काँग्रेसचे चंद्रकांत बावणकुळे विजयी

### प्रभाग क्र. २ अ
एकूण वैध मते - २१६३

| | | |
|---|---|---|
| १. | बबिता आमले | १४७९ |
| २. | अर्चना उइके | ५४७ |
| ३. | उज्ज्वला मगरे | ६१ |
| | नोटा - | ७६ |

प्रभाग २ अ मध्ये काँग्रेसच्या बबिता आमले विजयी

### प्रभाग क्र. २ ब
एकूण वैध मते - २१६३

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाश खोब्रागडे | ९३० |
| २. | श्रीधर टोंगे | ६६ |
| ३. | रितेश दशमवार | १५८ |
| ४. | राहूल भोयर | ९६ |
| ५. | सुरज माकडे | ४९१ |
| ६. | एकनाथ विखार | २५ |
| ७. | दिनकर शुक्ला | ३५६ |
| ८. | आशिष सोन्डवले | २२ |
| | नोटा - | १९ |

प्रभाग २ ब मध्ये काँग्रेसचे प्रकाश खोब्रागडे विजयी

### प्रभाग क्र. ३ अ
एकूण वैध मते - १८६५

| | | |
|---|---|---|
| १. | राहुल करंबे | ४९१ |
| २. | मनोज कावळे | ११०२ |
| ३. | सहादेव भानारकर | १७७ |
| ४. | आकाश शेंदरे | ६२ |
| | नोटा | ३३ |

प्रभाग ३ अ मध्ये काँग्रेसचे मनोज कावळे विजयी

### प्रभाग क्र. ३ ब
एकूण वैध मते - १८६५

| | | |
|---|---|---|
| १. | मिनल गजभिये | १२२ |
| २. | रेणू ठेंगरे | १२६१ |
| ३. | प्रतिभा मैंद | ४२२ |
| | नोटा - | ६० |

प्रभाग ३ ब मध्ये काँग्रेसच्या रेणू झ्ुंगरे विजयी

### प्रभाग क्र. ४ अ
एकूण वैध मते - १६१३

| | | |
|---|---|---|
| १. | प्रेमलाल मेश्राम | ६३ |
| २. | अशोक रामटेके | ६११ |
| ३. | विजय रामटेके | १८ |
| ४. | प्रकाश लोखंडे | २२० |
| ५. | अनुकूल शेन्डे | ६७५ |
| | नोटा - | २६ |

प्रभाग ४ अ मध्ये काँग्रेसचे अनुकूल शेन्डे विजयी

### प्रभाग क्र. ४ ब
एकूण वैध मते - १६१३

| | | |
|---|---|---|
| १. | जयश्री कुथे | ६४७ |
| २. | हेमलता नाकतोडे | ३८ |
| ३. | रश्मी पेशने | ५०९ |
| ४. | शिवानी सेठिया | ३८५ |
| | नोटा - | ३४ |

प्रभाग ४ ब मध्ये काँग्रेसच्या जयश्री कुथे विजयी

### प्रभाग क्र. ५ अ
एकूण वैध मते - १६११

| | | |
|---|---|---|
| १. | अंकज कानझोडे | ५७७ |
| २. | महेश जनबंधू | ४२ |
| ३. | सतीश हुमने | ९५३ |
| | नोटा - | ३९ |

प्रभाग ५ अ मध्ये काँग्रसचे सतीश हुमने विजयी

### प्रभाग क्र. ५ ब
एकूण वैध मते - १६११

| | | |
|---|---|---|
| १. | रंजना पिसे | ११०४ |
| २. | चेतना येवले | ४०६ |
| ३. | रश्मी रापेल्लीवार | ५८ |
| | नोटा - | ४३ |

प्रभाग ५ ब मध्ये काँग्रेसच्या रंजना पिसे विजयी

### प्रभाग क्र. ६ अ
एकूण वैध मते - १९१५

| | | |
|---|---|---|
| १. | मनिषा नागापूरे | १८० |
| २. | रूपाली रावेकर | ७२४ |
| ३. | हेमलता सिंहगडे | ९७१ |
| | नोटा - | ४० |

प्रभाग ६ अ मध्ये काँग्रेसच्या हेमलता सिंहगडे विजयी

### प्रभाग क्र. ६ ब
एकूण वैध मते - १९१५

| | | |
|---|---|---|
| १. | सुनिल कुंभारे | ३४ |
| २. | निहाल ढोरे | ५१ |
| ३. | जगदिश पिलारे | १३९९ |
| ४. | विजय रामटेके | ३९ |
| ५. | राकेश वैलथरे | ३७४ |
| | नोटा - | १८ |

प्रभाग ६ ब मध्ये काँग्रेसचे जगदिश पिलारे विजयी

### प्रभाग क्र. ७ अ
एकूण वैध मते - २५३८

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिमा कोसे | ४८४ |
| २. | सुर्यकांता गेडाम | ५१४ |
| ३. | माला माटे | २१९ |
| ४. | गिता मेश्राम | ९५८ |
| ५. | प्रिताई मेश्राम | १५९ |
| ६. | अंकिता शेन्डे | १३५ |
| | नोटा - | ६९ |

प्रभाग ७ अ मध्ये काँग्रेसच्या गीता मेश्राम विजयी

### प्रभाग क्र. ७ ब
एकूण वैध मते - २५३८

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिक घाटोळे | ६४ |
| २. | रवि चहांदे | ७७६ |
| ३. | नरेंद्र नरड | ८० |
| ४. | अमोल भानारकर | ३५० |
| ५. | चंद्रशेखर मेश्राम | ८१ |
| ६. | आकाश राऊत | ४५ |
| ७. | सचिन राऊत | ८६४ |
| ८. | अमित रोकडे | २५६ |
| | नोटा - | २२ |

प्रभाग ७ ब मध्ये काँग्रेसचे सचिन राऊत विजयी

### प्रभाग क्र. ८ अ
एकूण वैध मते - २१८५

| | | |
|---|---|---|
| १. | दर्शना अंडेलकर | ४९० |
| २. | केश्विनी गोंडाणे | ४१७ |
| ३. | अर्चना धोंगडे | ३७ |
| ४. | पुष्पलता पोपटे | १०१० |
| ५. | करूणा बोदेले | १७३ |
| | नोटा - | ५८ |

प्रभाग ८ अ मध्ये काँग्रेसच्या पुष्पलता पोपटे विजयी

### प्रभाग क्र. ८ ब
एकूण वैध मते - १६१३

| | | |
|---|---|---|
| १. | नितिन उराडे | १२०१ |
| २. | चंद्रकांत कुंभारे | २२ |
| ३. | बालू बोरकर | ५६० |
| ४. | महेंद्र मातेरे | ७० |
| ५. | मनोज वठे | २१४ |
| | नोटा - | ३७ |

प्रभाग ८ ब मध्ये काँग्रेसचे नितिन उराडे विजयी

### प्रभाग क्र. ९ अ
एकूण वैध मते - १६८८

| | | |
|---|---|---|
| १. | अनिल दोनाडकर | ८२८ |
| २. | मनोज भूपाल | ८३५ |
| | नोटा - | २५ |

प्रभाग ९ अ मध्ये भाजपचे मनोज भुपाल विजयी

### प्रभाग क्र. ९ ब
एकूण वैध मते - १६८८

| | | |
|---|---|---|
| १. | सपना बल्लारपूरे | ९०० |
| २. | सरिता भैरव | १२० |
| ३. | भावना येरावार | ६३५ |
| | नोटा - | ३३ |

प्रभाग ९ ब मध्ये काँग्रेसच्या सपना बल्लारपूरे विजयी

### प्रभाग क्र. १० अ
एकूण वैध मते - १९७०

| | | |
|---|---|---|
| १. | स्वप्निल अलगदेवे | ७६० |
| २. | सुशिल थारकर | १९० |
| ३. | राकेश पडोळे | ९९२ |
| | नोटा - | २८ |

प्रभाग १० अ मध्ये काँग्रेसचे राकेश पडोळे विजयी

### प्रभाग क्र. १० ब
एकूण वैध मते - १९७०

| | | |
|---|---|---|
| १. | मैथिली ताम्हण | ६६ |
| २. | भावना तुमाने | ६३ |
| ३. | दक्षाबेन पटेल | ६६९ |
| ४. | ज्योती राऊत | ८०२ |
| ५. | छाया वानखेडे | ३४३ |
| | नोटा - | २७ |

प्रभाग १० ब मध्ये काँग्रेसच्या ज्योती राऊत विजयी

### प्रभाग क्र. ११ अ
एकूण वैध मते - ३१५७

| | | |
|---|---|---|
| १. | माधुरी उपासे | २०५५ |
| २. | नंदा उरकुडे | ९८८ |
| | नोटा - | ११४ |

प्रभाग ११ अ मध्ये काँग्रेसच्या माधुरी उपासे विजयी

### प्रभाग क्र. ११ ब
एकूण वैध मते - ३१५८

| | | |
|---|---|---|
| १. | अंजली उरकुडे | १०५६ |
| २. | रंजना बुराडे | १९८८ |
| | नोटा - | ११४ |

प्रभाग ११ ब मध्ये काँग्रेसच्या रंजना बुराडे विजयी

### प्रभाग क्र. ११ क
एकूण वैध मते - ३१५८

| | | |
|---|---|---|
| १. | सारंग बनपूरकर | १२६१ |
| २. | प्रशांत बांबोळे | ४२ |
| ३. | हार्दिक रत्नपारखी | ४६४ |
| ४. | अविनाश राऊत | १२६२ |
| ५. | रक्षित रामटेके | १०५ |
| | नोटा - | २४ |

प्रभाग ११ क मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अविनाश राऊत विजयी

निवडणूकीत सर्व विजयी उमेदवारांचे....

हार्दिक अभिनंदन



# ने.हि. विद्यालयात शैक्षणिक साहित्य प्रदर्शनी व आनंदमेळा उत्साहात साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आनंदमेळा तसेच शैक्षणिक साहित्य प्रदर्शनी अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. के. एम. नाईक सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक श्री. एन. डब्ल्यू. नाकाडे सर, पर्यवेक्षक श्री. पी. आर. जीभकाटे सर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



शैक्षणिक साहित्य प्रदर्शन मध्ये विद्यालयातील ७१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता विद्यार्थ्यांनी विविध विषयाचे शैक्षणिक साहित्य निर्माण करून ते प्रदर्शनामध्ये सादर केले यामध्ये वेगवेगळ्या विषयांचा समावेश होता तसेच आनंदमेळ्यामध्ये विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी स्वत: पुढाकार घेऊन विविध प्रकारचे खाण्याचे पदार्थ विक्रीस मांडले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी नियोजन, संघभावना, व्यवहारज्ञान आणि ग्राहकांशी संवाद साधण्याचे कौशल्य आत्मसात केले. विशेष म्हणजे, या आनंदमेळ्यामुळे विद्यार्थ्यांना स्वत:च्या कमाईचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजले. मेहनतीने तयार केलेल्या वस्तू विकून स्वत: पैसे मिळविण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. स्वत: कमावलेल्या पैशातून येणारी आत्मसंतुष्टी, जबाबदारीची जाणीव आणि आर्थिक शिस्त याचे महत्त्व या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कळले. ‘पैसे सहज मिळत नाहीत, त्यासाठी कष्ट, नियोजन आणि प्रामाणिक प्रयत्न आवश्यक असतात,’ हा महत्त्वाचा जीवनधडा विद्यार्थ्यांनी या आनंदमेळ्यातून शिकला. इतर विद्यार्थ्यांनीही विविध स्टॉल्सना भेट देत या आनंदमेळ्याचा मनसोक्त आनंद घेतला. संपूर्ण परिसर आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेने भारलेला दिसून आला.

अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, स्वावलंबन व आत्मविश्वास निर्माण करण्यास उपयुक्त ठरतात, असे मत विद्यालयाचे मुख्याध्यापक के एम नाईक यांनी व्यक्त केले. या आनंदमेळ्याचे आयोजन यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# देलनवाडी वार्ड येथे गाडगे महाराजांची ६९ वी पुण्यतिथी

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील संत गाडगे महाराज स्मारक येथे संत गाडगे महाराज यांची ६९ वी पुण्यतिथी अत्यंत श्रद्धा व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रवीभाऊ मेश्राम हे होते. यावेळी मंगेश मेश्राम (सचिव), प्रशांत मेश्राम (कोषाध्यक्ष), लालाजी पेंदोरकर (सहसचिव), प्रमोद वा. मेश्राम (कार्याध्यक्ष), संजय मेश्राम (सल्लागार), चंद्रकांत ताडपल्लीवर (मार्गदर्शक) यांच्यासह अरविंद मेश्राम, माणिक केळझारकर, दिवाकर मेश्राम, सुनील शिरपूरकर, ज्ञानेश्वर मेश्राम, महेश बारसागडे, अंकुश मेश्राम (युवा अध्यक्ष), योगेश बारसागडे, राजेंद्र शेंडे, रवींद्र केळझारकर, सचिन लोणारकर, किशोर लाडे, विशाल चिकनकर, सतीश मेश्राम आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# किडनी प्रकरणात शेतकरी रोशन कुडेला न्याय मिळवून देण्यास बच्चू कडू काढणार लाँगमार्च

नागभीड/प्रतिनिधी

प्रहार संघटनेचे संस्थापक तथा माजी आमदार बच्चू कडू यांनी शनिवार, २० डिसेंबर रोजी शेतकरी रोशन कुळे यांची भेट घेतली. नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रहिवासी कुळे यांना सावकारी कर्जाची परतफेड करण्यासाठी स्वत:ची किडनी विकावी लागली होती. हे प्रकरण प्रकाश झोतात येताच, साऱ्याचे लक्ष आता मिंथुर गावाकडे लागले आहे. कुळे यांच्या भेटीला बच्चू कडू मिंथुर येथे आले होते. या भेटीप्रसंगी रोशन कुळे यांना अश्रू अनावर झाले.



रोशन यांनी बच्चू कडू यांना आपली आपबिती सांगितली. त्यावर कडू यांनी संताप व्यक्त केला. शेतकऱ्याला कर्जाची परतफेड करण्यासाठी किडनी विकावी लागत असेल, तर पुरोगामी महाराष्ट्र कोणत्या दिशेला चालला आहे, असे ते म्हणाले. हा गंभीर प्रकार असून, ही लढाई एकट्या रोशनची नसून आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी येत्या ३ जानेवारीला मिंथुरपासून नागभीडपर्यंत मोठा ‘लाँगमार्च’ काढण्याची घोषणाही यावेळी बच्चू कडू यांनी केली. बच्चू कडू म्हणाले, कर्जाची परतफेड करण्यासाठी कुळे यांना किडनी विकावी लागली, हा प्रकार अतिशय गंभीर आहे. याची दखल राज्य शासनाने त्वरित घ्यावी. रोशन यांना धमक्यांचे फोन येत होते, त्यांचे अपहरण करण्यात आले. त्यामुळे त्याला किडनी विकावी लागली. त्यासाठी अपहरणाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याचबरोबर फसवणुकीचा गुन्हाही दाखल झाला पाहिजे. तसेच जबर मारहाणीचा गुन्हा दाखल केला नसल्याने तो पण गुन्हा दाखल झाला पाहिजे.

रोशन यांनी कंबोडिया या देशात किडनी विकायला गेला याची ‘एसआयटी’ चौकशी झाली पाहिजे. राज्यामध्ये सावकरी प्रकरणाचे गुन्हे सर्रास सुरू आहे. त्याबरोबर मायक्रो फायनान्स या कंपन्यांवरसुद्धा बंधने आणली पाहिजे. ही लढाई नागभीडपुरती नाही किंवा एकट्या रोशन पुरती नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राची आणि देशव्यापी आहे. रोशन कुळे या शेतकऱ्याला त्याचे पैसे परत मिळाले पाहिजे. कारण त्याने आजच्या बाजार भावापेक्षा कमी भावाने शेती विकली आहे. ३ जानेवारीला रोशनच्या घरापासून ते नागभीडपर्यंत पायदळ मोर्चा काढला जाणार असून, मागण्या पूर्ण झाल्या नाही तर मोठे आंदोलन करणार असल्याचेही बच्चू कडू यांनी सांगितले.

जल है तो कल है...

# ब्रम्हपुरीचे वादग्रस्त एसडीपीओ राकेश जाधव यांची अखेर बदली

ब्रम्हपुरी/का.प्र.



सतत वादाच्या भोवऱ्यात राहिलेले आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे चर्चेत असलेले ब्रम्हपुरी उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव यांची अखेर बदली करण्यात आली आहे. हिवाळी अधिवेशनात या प्रकरणावर जोरदार चर्चा झाल्यानंतर गृह विभागाने ही कारवाई केल्याने पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत राकेश जाधव यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करीत त्यांच्या विरोधातील भ्रष्टाचाराच्या आरोपांकडे लक्ष वेधले होते. या मुद्यावर सभागृहात जोरदार गदारोळ झाला होता. वाढता जनक्षोभ आणि लोकप्रतिनिधींचा दबाव लक्षात घेता शासनाने अखेर जाधव यांची बदली करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येते. राकेश जाधव यांच्यावर ५० हजार रुपयांच्या लाचखोरीचा आरोप असून वाळूने भरलेला एक हायवा ट्रक तब्बल दहा दिवस पोलीस ठाण्यात बेवारस स्थितीत ठेवून त्यावर कारवाई करण्यात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. या प्रकरणी त्यांच्याविरोधात खातेनिहाय चौकशी सुरू असून चौकशी अहवाल महानिरीक्षकांकडे सादर करण्यात आला असल्याची माहिती आहे.

विधिमंडळ अधिवेशनात हा मुद्दा गाजल्यानंतर गृह विभागाने तातडीने पावले उचलत जाधव यांची उचलबांगडी केली आहे. सध्या त्यांच्या बदलीनंतरच्या नव्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# आता बँकेत न जाताही शेतकऱ्यांना मिळणार कर्ज...!

## महाराष्ट्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय; जनसमर्थक पोर्टलमध्ये करावी लागणार नोंदी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांना एक आंनदाची बातमी असून बँकेत न जातानाही त्यांना आता पीक कर्ज मिळणार आहे. जनसमर्थक पोर्टलवर सर्वप्रथम शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. त्यानंतर कर्ज मागणीचा अर्ज केल्यानंतर संबंधित बँकेकडे कर्जदाराचे अर्ज ऑनलाईन जातील. त्यानंतर त्वरेने कर्ज मिळणार आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या बळीराजांना दिलासा मिळणार आहे.

जनसमर्थक या नावाने शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपासाठी प्रशासनच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा फॉर्मर आयडी, आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक आदी संकलित करून त्यानुसार पात्र प्रस्ताव बँकांकडे कर्जासाठी पाठविण्यात येणार आहे. कागदपत्रांची पडताळणी करूनच बँकेकडे ऑनलाईन प्रणालीने कर्ज प्रकरण जाणार असल्याने बँकांना आता कर्ज नाकारता येणार नाही.

कर्ज मिळविण्यासाठी अनेकदा बँकेची पायरी चढावी लागते. बँका कर्ज प्रकरणाच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी काढून त्याची व्यवस्थित पूर्तता करण्याची सूचना देतात. त्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. त्या सर्व गोष्टी दूर करण्यासाठी शासनाने आता जनसमर्थक पोर्टलची निर्मिती केली आहे. या पोर्टलवर कर्जदाराने नोंदणी करावी. त्यानंतर कर्ज मागणीविषयक अर्ज ऑनलाईनच भरावा. दरम्यान, शेतकऱ्यांकडून ई-सेवा व सेतू सुविधा केंद्रात पीक कर्ज मागणीचा अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे भरून घेण्यात येत आहे. संबंधित इच्छुक पात्र कर्जदार शेतकऱ्यांना एका तासात कर्ज मंजुरी मिळणार असल्याची माहिती आहे. शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील काही जिल्ह्यात हा प्रयोगशील उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

# नितिन उराडे यांची सर्वानुमते गटनेपदी निवड

## ब्रम्हपुरी नगर परिषदेत काँग्रेसचा दणदणीत विजय

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये ब्रह्मपुरीत काँग्रेसने ऐतिहासिक कामगिरी करत मोठा विजय मिळवला आहे. ०२ डिसेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल रविवार, २१ डिसेंबरला जाहीर झाला असून नगरपरिषदेच्या एकूण २३ नगरसेवकांपैकी तब्बल २१ नगरसेवक काँग्रेसचे निवडून आले आहेत. यासोबतच अध्यक्षपदावरही काँग्रेसचा उमेदवार निवडून आल्याने शहराच्या राजकारणात काँग्रेसचे वर्चस्व स्पष्टपणे अधोरेखित झाले आहे.

या निवडणुकीत काँग्रेसचे केवळ दोन उमेदवार



पराभूत झाले असून तो पराभवही अत्यंत कमी मतांनी झाला आहे. एक उमेदवार अवघ्या सात मतांनी तर दुसरा फक्त एक मतांनी पराभूत झाला. त्यामुळे हा निकाल पराभवापेक्षा काँग्रेसच्या व्यापक जनाधाराची साक्ष देणारा मानला जात आहे. निकालानंतर सर्व विजयी नगरसेवकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत काँग्रेसचे पदाधिकारी व नगरसेवक यांच्यात सविस्तर चर्चा झाली. या चर्चेनंतर मनमिळाऊ स्वभाव, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती, निस्वार्थ दृष्टिकोन आणि पक्षाशी असलेली एकनिष्ठा या गुणांच्या आधारावर नगरसेवक नितीन उराडे यांची सर्वानुमते काँग्रेस गटनेतेपदी निवड करण्यात आली.

नितीन उराडे यांचा कार्यकाल हा केवळ राजकीय नेतृत्वापुरता मर्यादित न राहता जनतेच्या सेवेसाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दिशादर्शक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहर विकास, मूलभूत सुविधा, नागरिकांचे प्रश्न आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर ते जातीने लक्ष देतील, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये खात्री आहे.

# रानबोथली येथे वनराई बंधारा बांधकाम




ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २२/१२/२०२५ ला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत लोक-सहभागातून व श्रमदानातून लोकचळवळ उभी करणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रम या सदराखाली मौजा रानबोथली येथे गावालगतच्या नाल्यावर नळ योजनेच्या पाणीपुरवठा विहीरीजवळ लोकसहभाग व श्रमदानातून वनराई बंधारा बांधकाम करण्यात आला.

त्यामध्ये सरपंच सचिन लिंगायत, ग्रा पं सदस्य नुपेंद्र नाकतोडे, ग्रा पं सदस्य शंकर भुते, पोलीस पाटील सचिन नाकतोडे, शाळा समिती अध्यक्ष खुशाल नाकतोडे, कृषी मित्र रामदास मैंद, ग्रामपंचायत अधिकारी पुंडलिक ठाकरे, कृषि सहाय्यक पुरुषोत्तम आस्कर, कृषि सेवक रोहीत थुल, गावातील शेतकरी मुखरू कोल्हे, विनायक बांगरे, अनंदा नाकतोडे, पार्वता जांभुळे, धनश्री तुपट, रोजगार सहाय्यक प्रलय नाकतोडे, केंद्र चालक वासुदेव ठाकरे, ग्रा पं कर्मचारी हरिदास खरकाटे, पा पु कर्मचारी रोहीत बगमारे आदींनी श्रमदान केले. या बंधाऱ्यामुळे नाल्याच्या पाणी साठ्यात वाढ होऊन नळ योजनेच्या पाणीपुरवठा विहिरीला आणि लगतच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी फायदा होणार आहे.

❀❀❀❀❀❀❀

# गोगावमध्ये बाप-लेकाला मारहाण, पिडीतांची न्यायाची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोगाव येथे घडलेल्या गंभीर मारहाणीच्या घटनेत सुनील शेंडे व त्यांच्या वडिलांना अमानुष मारहाण करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या मारहाणीत दोघांनाही डोक्याला गंभीर दुखापत होऊन टाकेपडले असून हाताच्या बोटांना देखील जबर इजा झाली आहे. या प्रकरणात संबंधित आरोपींवर कारवाई होण्याऐवजी पीडितांवरच खोटी तक्रार दाखल करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात येत असून अन्यायग्रस्त कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहे.

०५ डिसेंबर रोजी सायंकाळी सुनील शेंडे कामावरून घरी परतले असता घरातील कामातून उरलेले विटांचे तुकडे बाजूला टाकत होते. त्यावेळी बौद्ध समाजाच्या ६ डिसेंबरच्या कार्यक्रमासाठी लावण्यात येणाऱ्या लाइटसंदर्भात अध्यक्ष व सचिव तिथे आल्या. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ लहान मुले क्रिकेट खेळत असल्याने मूर्तीला इजा होण्याची शक्यता असल्याचा मुद्दा सुनील शेंडे यांनी उपस्थित केला. ही बाब मुलांनी ऐकली व घरी जाऊन सांगितली त्यातून गैरसमज निर्माण झाला. यानंतर सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास सुनील शेंडे यांच्या घरासमोर त्यांच्या वडिलांवर लाठ्या, काठ्या व हातांनी रणजित खोब्रागडे, सागर खोब्रागडे, समीर खोब्रागडे व सीमा खोब्रागडे हे सुनील शेन्डे यांच्या वडिलांना बेदम मारहाण करत असल्याचे दिसून आले.

वडिलांच्या डोक्यातून रक्त वाहत असताना त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला असता सुनील शेन्डे यांनाही मारहाण करण्यात आली. या मारहाणीत दोघांच्या डोक्याला गंभीर जखमा होऊन रक्तबंबाळ झाले. घटनेची तक्रार मेंडकी पोलीस चौकीत करण्यात आली. मेंडकी पोलिस ठाण्यात शेन्डे व त्याचे वडील पोचल्यानंतर घडलेला प्रकार बीट जमादारांना सांगितला. मात्र, पोलिसांकडून दमदाटी व अपमानास्पद वागणूक मिळाल्याचाही आरोप पीडितांनी केला आहे.

... QUOTES ...

"You don't have to be great to start, but you have to start to be great."

\- Zig Ziglar

**चारोळी**

तुझ्यासोबत संसार करतांना
तुझा बाहेरख्यालीपणा खपवून घेईन...
घरापर्यंत हाकबोंब आणू नको,
तुला एटिकेटी नवरा मानून घेईन...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# विज्ञान मंथन परिक्षेत ने.हि. विद्यालयाची उज्ज्वल कामगिरी

## राज्यस्तरीय परीक्षेसाठी विद्यालयाचे दोन विद्यार्थी पात्र

ब्रह्मपुरी/का.प्र.


भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रीय मॅडम यांच्या मार्गदर्शनात इयत्ता दहावीतील साईनाथ भाऊराव आत्राम आणि अभिजीत कृष्णा किरमीरे या दोन विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची प्रचिती दिली आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यालयाचा



शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) यांच्या सहकार्याने विज्ञान भारती उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थी विज्ञान मंथन (VVM) राष्ट्रीय विज्ञान प्रतिभा शोध परीक्षा २०२५-२६ मध्ये नेवजाबाई हितकारिणी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.


विद्यालयातील विज्ञान शिक्षिका सोनाली कलकोटवार विभागीय स्तरावरील परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करत राज्यस्तरीय परीक्षेसाठी पात्रता मिळवली आहे. विशेष बाब म्हणजे संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातून निवड झालेल्या अवघ्या १४ विद्यार्थ्यांमध्ये या विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा समावेश असून, त्यांनी महाराष्ट्रातील अव्वल २५ विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयातील सखोल ज्ञान, तर्कशुद्ध विचारशक्ती व सातत्यपूर्ण नावलौकिक वाढला असून परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोकजी भैया, मुख्याध्यापक के. एम. नाईक सर, उपमुख्याध्यापक एन. डब्ल्यू. नाकाडे सर, पर्यवेक्षक पी. आर. जीभकाटे सर तसेच सर्व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.






## किडनी रॅकेट प्रकरणातील मास्टर...

(पान क्र. १ वरून)

गुन्हा दाखल झाल्यानंतर राज्यभरात खळबळ उडाली. त्यानंतर मानवी अवयवांची तस्करीच्या दिशेने तपास सुरू झाला.

या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष पथक गठित करण्यात आले. सात दिवस लोटूनही तपास पथकाला काहीच ठोस हाती लागले नव्हते. मात्र, रविवारी दि. २१ ला डॉ. कृष्णाला सोलापूरात रात्री उशिरा अटक करण्यात आली. तपासात 'डॉ. कृष्णा' हे त्याचे नाव बनावट असल्याचे समोर आले. तो व्यवसायाने इंजिनिअर असल्याचे समजते. आर्थिक विवंचनेत असल्याने त्याने कपड्याचा व्यवसायही केला. मात्र, त्याचा हा व्यवसाय बुडाला. यातून त्याने स्वत:ची किडनी विकली. त्याचे खरे नाव 'रामकृष्णन मल्लेशम सुंचू' वय ३६ वर्ष असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर तो किडनी विक्रीच्या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करू लागला. त्याने आतापर्यंत डॉक्टर असल्याची बतावणी करून दहा ते बारा युवकांचे मुत्रपिंड/किडनी कंबोडियात विकले आहेत. या मोबदल्यात त्याला एक लाख रूपये कमिशन मिळत होते.

## ब्रम्हपुरी नगराध्यक्षपदी...

(पान क्र. १ वरून)

(काँग्रेस) (१४८९ मते), (ब) प्रकाश खोब्रागडे (काँग्रेस) (९३० मते), प्रभाग क्रमांक ३ (अ) मनोज कावळे (काँग्रेस) (११०२ मते), (ब) रेणू ठेंगरे (काँग्रेस) (१२६१ मते), प्रभाग क्रमांक ४(अ) अनुकूल शेंडे (काँग्रेस) (६७५ मते), (ब) जयश्री कुथे (काँग्रेस) (६४७ मते), प्रभाग क्रमांक ५ (अ) सतीश हुमणे (काँग्रेस) (९५३ मते), (ब) रंजना पिसे (काँग्रेस) (११०४ मते), प्रभाग क्रमांक ६ (अ) हेमलता सिंहगडे (काँग्रेस) (९७१ मते),(ब) जगदीश (मोंटू) पिलारे (काँग्रेस) (१३९९ मते), प्रभाग क्रमांक ७ (अ) गीता मेश्राम (काँग्रेस) (९५८ मते), (ब) सचिन राऊत (काँग्रेस) (८६४ मते) प्रभाग क्रमांक ८ (अ)पुष्पलता पोपटे (काँग्रेस) (१०१० मते), (ब) नितिन उराडे (काँग्रेस) (१२०१ मते), प्रभाग क्रमांक ०९ (अ) मनोज भूपाल (भाजपा) (८३५ मते), प्रभाग क्रमांक ९(ब)सपना बल्लारपुरे (काँग्रेस) (९०० मते), प्रभाग क्रमांक १०(अ) राकेश पडोळे (काँग्रेस) (९९२ मते),(ब) ज्योती राऊत (काँग्रेस) (८०२ मते) प्रभाग क्रमांक ११ (अ) माधुरी उपासे (काँग्रेस) (२०५५ मते),(ब) रंजना बुराडे (काँग्रेस) (१९८८ मते), प्रभाग क्रमांक ११ (क) अविनाश राऊत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) (१२६२ मते)यांचा समावेश आहे.

काँग्रेस पक्षाने नगरपालिका निवडणूकीत २३ पैकी २१ जागांवर एकहाती सत्ता स्थापित केले असून हा मतदारांचा कौल असल्याचे बोलले जात असून ब्रम्हपुरी नगर पालिका क्षेत्रात भारतीय जनता पक्षाचा सुफडा साफ झाला आहे. भारतीय जनता पक्षातील अंतर्गत गटबाजीचा फटका नगर पालिका निवडणूकीत पहायला मिळाला. या निकालामुळे भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांना मोठा धक्का बसला. भारतीय जनता पक्षाचे नुकतेच निवडून आलेले नगरसेवक मनोज भूपाल हे अवघ्या ०७ तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे अविनाश राऊत केवळ ०१ मताधिक्याने निवडून आले.

## शेतकऱ्यांची एमएसईबी कार्यालयावर धडक

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यात मागील वर्षी कृषी पंपाची वीज बारा तास नियमितपणे सुरू होती परंतु अचानक पणे गेल्या दोन-तीन महिन्यापासून आठ तास वीज सुरू आहे. शासनाने १२ तास वीज द्यावी हे आदेश असताना एम एस ई बी कार्यालयाकडून शेतकऱ्यावर अन्याय होत आहे. यावर्षी खरीप हंगामात , पूर परिस्थिती, ओला दुष्काळ झाला त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

पूर्ववत १२ तास वीज पुरवठा सुरू करण्यासाठी तसेच परिसरातील वीजेसंबंधी तक्रारींची समस्या दूर न झाल्यास आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात दिला आहे. निवेदन देतेवेळेस ईश्वर ठाकरे, राजेंद्र झोडगे, मनोज हुलके, भक्तदास ठाकरे, प्रतीक डांगे, दत्तू नागोसे, अमोल मानापुरे उपस्थित होते.




Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404